साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) या राष्ट्रीय महामंडळाकडून घ्यावयाच्या कर्जासाठी रु.७० कोटींची शासन हमी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : शाहमी-२०१९ /प्र.क्र. ०५/अर्थबळ
मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१९.

वाचा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. शासन हमी-१०९९/प्र.क्र. ६८/शासन हमी,दि. ५.११.१९९९.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-शाहमी १००८/प्र.क्र. १८/शा हमी, दि. २८.०४.२००८.

प्रस्तावना :

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना राज्यात राबविण्यासाठी या राष्ट्रीय महामंडळाची राज्य प्राधिकृत वाहिनी म्हणून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे काम करते. सदर महामंडळास राज्य शासनाने मंजूर केलेल्या हमीच्या आधारावर राष्ट्रीय महामंडळाकडून अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा करण्यात येतो. यापूर्वी उक्त महामंडळास देण्यात आलेल्या शासन हमीचा कालावधी संपुष्टात आल्याने राष्ट्रीय महामंडळाकडून निधी उपलब्ध होत नव्हता. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकडे प्रलंबित असलेली कर्ज प्रकरणे विचारात घेऊन राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) यांचेकडून घ्यावयाच्या कर्जास शासन हमी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मर्या. मुंबई या महामंडळास राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) या राष्ट्रीय महामंडळाकडून कर्ज उपलब्ध होण्यासाठी रु. ७०.०० कोटीच्या (रु. सत्तर कोटी फक्त) मर्यादेत शासन हमी देण्याचा निर्णय खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाने घेतला आहे.

२. शासन हमीवरील कर्ज आवश्यकतेनुसार उचलण्याची मुदत दिनांक ३१/१२/२०१९ पर्यत वैध राहील. शासनाने दिलेल्या हमी रकमेच्या मर्यादेतच कर्ज उचल करण्याची कार्यवाही महामंडळाने करावी. तसेच हमी रकमेत वाढ किंवा मुदतवाढ मागण्याची कार्यवाही करु नये.

३. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास एकूण रु.७० कोटीची (रु. सत्तर कोटी फक्त) हमी अ.क्र.१ येथील शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ०५.११.१९९९ मध्ये नमूद केलेल्या अटी तसेच खालील अटी व शर्तींच्या अधीन राहील :-

३.१ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई हे Principle Debtor राहील.

३.२ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने त्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवून व्याज, हमी शुल्क तसेच अधिपरिव्यय (Over head Cost) यांची पूर्णपणे वसुली होऊ शकेल अशी व्यवस्था करावी.

३.३ ज्या लाभार्थ्यांना कर्ज देण्यात येते त्या लाभार्थ्यांची पतयोग्यता व योग्य प्रतिभूती यांची छाननी व खात्री करुन घेण्याची एक यंत्रणा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ कार्यान्वित करेल. त्याचप्रमाणे कर्जफेडीत कसूरी झाल्यास कर्ज मंजूर / शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल व त्यांचे यासंबंधीचे अधिकार काढून घेण्यात येतील.

३.४ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मर्या. मुंबई महामंडळाने प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) यांच्याकडून उपलब्ध होणाऱ्या कर्जाबाबत आढावा घेऊन त्यांसंबंधीच्या वित्तीय मर्यादा शासनाकडून निश्चित करुन घ्याव्यात.

३.५ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने लाभार्थ्यांना मंजूर केलेल्या कर्जाची वसूली परतफेडीच्या वेळापत्रकानुसार वेळोवेळी करावी.

३.६ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ यांनी दर तीन महिन्यांनी कर्ज मंजूर झालेल्या प्रकल्पाच्या प्रगतीबाबतची स्थिती दर्शविणारी माहिती तसेच कर्ज वसुलीचा व वित्तीय दायित्वाचा अहवाल सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/वित्त विभागाकडे सादर करावा.

३.७ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने विहित कार्यपध्दतीने लेखा परिक्षीत केलेल्या व संस्थेने मान्य केलेल्या संस्थेच्या लेख्याची एक प्रत प्रत्येक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याच्या आत शासनास सादर करावी.

३.८ राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) राज्य शासनाच्या पूर्व अनुमतीशिवाय साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास या आदेशामध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक कर्ज देणार नाही.

३.९ राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) यांच्याकडून ज्या प्रकल्पांना कर्ज मंजूरी दिलेली आहे, ते प्रकल्प व लाभार्थी वर्धनक्षम आहेत याची महामंडळाने खात्री करुन घ्यावी. तसेच राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) यांनी दिलेल्या कर्जाचा निधी ज्या प्रयोजनासाठी व अटीनुसार दिलेला आहे, त्यानुसार तो निधी विनियोगात आणावा.

३.१० राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) यांच्याकडून घेतलेल्या कर्जाचे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने लाभार्थ्यांना वाटप केल्यानंतर लाभार्थ्यांमार्फत कर्जाचा योग्य विनियोग/व्यवसाय होतो किंवा कसे यावर साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने लक्ष ठेवावे. त्यासाठी आवश्यक ती तपासणी करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. तसेच, कर्जाच्या योग्य विनियोगाबाबत कसूर केल्यास, कर्ज वितरण तात्काळ बंद करावे.

३.११ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ लाभार्थ्यांकडून कर्ज फेडीत कसुरी होण्याची शक्यता विचारात घेऊन, कर्जाच्या वसुलीकरिता पुरेशा मत्तेची प्रतिभूती म्हणून घेतल्यानंतरच कर्ज मंजूरी करेल. तसेच सदर मत्तेची तपासणी वेळोवेळी व कमीतकमी ६ महिन्यातून करेल. तसे न केल्यास संबंधित महामंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात यावे.

३.१२ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ त्यांच्या आर्थिक स्थितीबाबतचा अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये शासनास दर सहा महिन्यांनी (३०मार्च/३०सप्टेंबर) सादर करेल.

४. शासन हमी आवाहनीत करण्यासंदर्भात दोन्ही महामंडळासाठी सामायिक अटी व शर्ती :-

४.१ राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) यांच्याकडून घेतलेल्या कर्जाची पतरफेड/कर्ज वसुली करण्याकरिता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ सर्वतोपरी प्रयत्न करेल व असे प्रयत्न केल्यानंतरही वसुली झाली नाही तर प्रथमत: कर्ज

परतफेडीमध्ये कसुरी करणाऱ्या लाभार्थ्यांच्या मत्तेची विक्री करुन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ कर्जाची परतफेड करेल व कर्जाचे दायित्व शासनावर पडणार नाही याची दक्षता घेईल.

४.२ राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाला मंजूर केलेल्या कर्जाच्या आदेशामध्ये नमूद केलेल्या परतफेडीच्या वेळापत्रकानुसार कर्जाची परतफेड होईपर्यंत शासन हमी वैध राहील.

५. <u>हमी शुल्क</u>

५.१ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास प्र.श.प्र.व. हमीशुल्काचा दर रु.०.५०/- असा राहील. हे हमीशुल्क ज्या कालावधीकरीता देय राहील त्या कालावधीतील कोणत्याही दिवशी कमाल अदत्त असलेल्या कर्ज आणि व्याजाच्या एकूण रकमेवर (total maximum outstanding amount) देय राहील.

५.२ हमी शुल्काचा भरणा दर सहा महिन्यांनी वसुली करुन शासनाच्या खाती जमा करण्यास व्यवस्थापकीय संचालक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मर्या. मुंबई हे जबाबदार असतील. प्रत्येक वित्तीय वर्षाच्या ३१ मार्च, आणि/अथवा ३० सप्टेंबर, रोजी अदत्त असलेल्या घटना सापेक्ष दायित्वावर (Contingent Liability) अनुज्ञेय असलेल्या हमी शुल्काचा भरणा १ एप्रिल आणि/अथवा १ ऑक्टोबर रोजी करावा.

५.३ हमी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यामधून प्रथम थकित हमी शुल्कावरील दंडनीय व्याजाची रक्कम वळती करुन घेण्यात येईल. नंतर सर्वात जुन्या थकित हमी शुल्काची वसुली त्यानंतर त्यापेक्षा कमी जुन्या थकित हमी शुल्काची वसुली याप्रमाणे रक्कम वळती करुन घेण्यात येईल.

५.४ देय हमी शुल्क शासन तिजोरीत भरणा करण्यास महामंडळाकडून कसूर झाल्यास अशा कसूर केलेल्या थकित रक्कमेवर पहिल्या तीन महिन्यासाठी १६ टक्के दराने व त्या पुढील कालावधीसाठी २४ टक्के दराने व्याज आकारले जाईल.

५.५ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने शासन हमी शुल्काची रक्कम "००७५-संकीर्ण, सर्वसाधारण सेवा-१०८-हमी शुल्क" या लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करावी. व्यवस्थापकीय संचालक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या., मुंबई यांनी महामंडळाकडून देय असलेली हमी शुल्काची रक्कम शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा केली जाते याची खात्री करुन घ्यावी.

५.६ हमी शुल्क भरल्याच्या पृष्ठयर्थ चलनाची सांक्षाकित प्रत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने वित्त विभागास पाठवावी.

५.७ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने देय हमीशुल्काचा भरणा केला नाही तर सदर हमीशुल्क सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासनाकडे भरणा करेल व महामंडळाकडून वसूल करेल.

६. हा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कार्यासन-महामंडळे यांच्या नस्ती एलएएस-२०१८/प्र.क्र.२५१/महामंडळे वरील प्रस्ताव व वित्त विभागाच्या शासन हमी क्रमांक-७/२०१८-१९ यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NSFDC) यांच्या समवेत कर्ज घेण्यासंबंधी करावयाच्या करार पत्रावर स्वाक्षरी करण्याकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील

संबंधित सह सचिव/उप सचिव व वित्त विभागातील सह सचिव / उप सचिव (अर्थबळ) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०२२५११०६४०००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VAIBHAV RAJARAM RAJEGHATGE

Digitally signed by VAIBHAV RAJARAM RAJEGHATGE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=f453d869c76bb9b100c9474614e3d97070719ea461f32ccfef10b55651861f13, postalCode=400032, street=505,5TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=6a03597a54b133144c833ee1853c3c9283db0a6fa61c40eb89bcb7ecc64b8bdf, ou=FINANCE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VAIBHAV RAJARAM RAJEGHATGE
Date: 2019.02.25 15:50:02 +05'30'

(वैभव राजेघाटगे)

उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपालाचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,
३) मा. उपमुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानभवन सचिवालय, मुंबई (५ प्रती)
१०) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा इटमेंट, आझाद मैदान, मुंबई,
११) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक्स क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२०
१२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राज भुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४.
१३) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्स्कवादी) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोव मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३.
१४) इंडियन नॅशलन कॉंग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५.
१५) नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२१.
१६) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.
१७) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१८) व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली .
१९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२१) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२२) व्यवस्थापकीय संचालक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई.
२३) वित्त विभाग (साउ/ऋण व हमी संनियंत्रण कक्ष/व्यय-१४), मंत्रालय, मुंबई-३२.
२४) कक्ष अधिकारी (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२५) निवडनस्ती/ अर्थबळ.

ANNEXURE A

Proforma in which the information in respect of repayment of loan and financial liability of the borrower is to be submitted by the lending institute to the Government every six month (1st April/ 1st Oct)

1 **Name of Lending Institute:**

2 **Principal Debtor:**

3 **Name of Administrative Dept:**

4 **Guarantee No:**

5 **Date of Validity of Guarantee:**

6 **Report for the period from:** **To**

Guarantee & Repayment during the period **(Rupees)**

		Principal	Interest	Total
1	Outstanding guarantee at beginning of the period			
2	Additional guarantee sanctioned, if any during the period			
3	Toal Outstanding (1+ 2)			
4	Repayment of loan			
5	Balance at end of the period (3 - 4)			
6	Amount Credited in to Escrow A/C			
7	Net Balance (5 - 6)			

7 **Payment of Guarantee fees** **(Rupees)**

	Outstanding Amount	G . F.	Penal Fee	Total
1	Outstanding at the Beginning			
2	G. F. Paid (Rs.)			
3	Date			
4	Challan No.			
5	Balance at end of the period (1 - 2)			

8 **Types of assets taken as security against amount of loan / outstanding**

Description Secured	Estimated Value	How
(!)		
(ii)		
(iii)		
Total		

(P.T.O.)

9 Types of inspection of assets / due diligency by lending institute during last 6 months to ensure loans are properly secured.	
10. Financial Health of Principal Debtor (I) Total Turnover of the Principal Debtor (II) Total Profits (iii) % of profits as % of loan amount	
11. Is in the opinion of lending institute,the borrowing institute in a position to service the debt against which government guarantee is given	
12. Is in view of the lending institute, the borrowing institute being managed efficiently	
13. If not, type of corrective action proposed to be taken by lending institute	
14. Has the lending institute ensured that no further loans have been taken by the borrowing institute since the government guarantee was given	
15. Has the lending institute ensured that the guarantee fees has been paid to the Goveernment in order to keep the guareante alive and valid	